**L.C. BILL No. XIV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ .**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**( विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. )**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र
१९४९ चा ५९. महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,

१९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

१९६५ चा महा. ४०.

२०२५ चा महा. अध्या. ११.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, “मुंबई महानगरपालिका अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ५ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

१८८८ चा ३.

“परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.”.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

“परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.**

१९४९ चा ५९.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**५.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१ब) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची

निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.”.

प्रकरण चार

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

१९६५ चा महा. ४०.

**६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, “ नगरपरिषदा अधिनियम ” असा केला आहे) याच्या कलम ९अ मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

“परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.”.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

**७.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

“परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.”.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२५ चा महा. अध्या. ११.

**८.** (१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याची कलमे ५ब व ३७, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याची कलमे ५ब व १९ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) याची कलमे ९अ व ५१-१ब यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या पालिका सदस्याच्या जागेसाठी किंवा महापौर किंवा अध्यक्ष पदासाठी, निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) याच्या तरतुदींनुसार व त्याखाली केलेल्या नियमांनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, नामनिर्देशन पत्रासोबत सादर करील.

२. सन २०२५-२०२६ मध्ये, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मोठ्या प्रमाणात घेतल्या जाणार आहेत. राखीव जागांसाठी अशा निवडणुका लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जात पडताळणी समित्यांकडे मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त होतील. त्यामुळे, अशा निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यापूर्वी जात पडताळणी समित्यांवर कामाचा अतिभार पडण्याची शक्यता आहे आणि प्रत्येक पाच वर्षांनंतर अशा निवडणुकांपूर्वी अशी स्थिती उद्‌भवू शकते.

जात पडताळणी समित्यांनी वैधता प्रमाणपत्र वेळेत न दिल्याच्या कारणामुळे राखीव जागांवर, अशा निवडणुका लढविण्याच्या संधीपासून संभाव्य उमेदवार वंचित राहू शकतात. राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या आणि ज्यांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता जात पडताळणी समितीकडे अर्ज केलेले आहेत अशा व्यक्तींना त्या निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्याकरिता, आणि तसेच अशा व्यक्तीने सहा महिन्यात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास त्यांच्या निवडणुका भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल अशी तरतूद करण्याकरिता, उक्त नगरपालिका कायद्यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. ११), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**एकनाथ शिंदे**,
उप मुख्यमंत्री
(नगरविकास).

मुंबई,
दिनांक ३ डिसेंबर, २०२५.

## सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १४—मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५.

### ( मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यातील उतारे )

### (१८८८ चा महा. अधिनियम क्रमांक ३)

**१.** ते **५.** ** ** ** **

**५अ.** ** ** ** **

[ **५ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ]

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट- निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :"

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल. ]

" परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल."

**६.** ते **३६.** ** ** ** **

**३६अ.** ** ** ** **

महापौर व उप महापौर.

**३७.** (१) व (२). ** ** ** **

[(२अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यांच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल :]

"परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, "मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :"

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर- करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर राहण्यास निरर्ह ठरेल." ]

" परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा. नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत. अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली " सहा महिन्यांची " मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल."

(३) ते (८). ** ** ** **

**३७-१अ.** ते **३७-एक-अ-१.** ** ** **

**३७अ.** आणि **३८ब.** ** ** **

**३८.** ते **५२७अ.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

## (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे )

## (१९४९ चा महा. अधिनियम क्रमांक ५९)

**१.** ते **५.** ** ** ** **

**५अ.** ** ** ** **

[ **५-ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ] राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट- निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, " मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा : आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील : ".

" परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल. "

" परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची " मुदत " बारा महिन्यांची " म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

**६.** ते **१८.** ** ** ** **

**१९.** (१) ** ** ** ** महापौर व उप महापौर.

(१अ) ** ** ** **

[ (१ब) अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेषमागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.]

" परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, "मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत, -

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिनं पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा : आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत. वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर राहण्यास निरर्ह ठरेल."

" परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

(२) ते (६).    **    **    **    **

**१९-एक-अ. ते १९अ.**    **    **    **

**२०. ते ४९३.**    **    **    **

**परिशिष्टे**    **    **    **

**अनुसूची.**    **    **    **

## (महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यातील उतारे )

## ( १९६५ चा महा. अधिनियम क्रमांक ४०)

**१.** ते **९.** ** ** ** **

[ **९-अ.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशिन पत्राबरोवर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ] राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट- निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, "मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा : आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :

परंतु, आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल. ]

"परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली "सहा महिन्यांची" मुदत "बारा महिन्यांची" मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

(३) ** ** ** **

**१०.** ते **५१.** ** ** ** **

**५१अ-१अ.** व **५१-१अ.** ** ** **

सभापतीच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे.

[ **५१-१ब.**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सभापतीच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचं व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. ].

" परंतु, अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक हा, "मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या आणि ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपणाऱ्या" कालावधी दरम्यानचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र,

सादर करील :"

परंतु, आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष राहण्यास निरर्ह ठरेल. ]

" परंतु तसेच, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, पहिल्या परंतुकाच्या खंड ( दोन ) अन्वये कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या हमीपत्राच्या बाबतीत, अशा हमीपत्रामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली " सहा महिन्यांची " मुदत "बारा महिन्यांची " मुदत म्हणून दाखल करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.".

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **५१अ.** ते **५१ब.** | ** | ** | ** | ** |
| **५२.** ते **३५१.** | ** | ** | ** | ** |
| **अनुसूची.** | ** | ** | ** | ** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (नगरविकास).**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.